पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
दिनांक १६/०२/२०२२ (बुधवार)

---

## कळमेश्वर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण, नागपुर शहर हद्‌दीत चोरी करणा—या सराईत चोरट्यास कळमेश्वर पो स्टे कडुन अटक आरोपीकडुन एकुण ६ गुन्हयाची कबुलीव एकुण १५,४२,५००/—रू व २ पिकअप, एक मोटरसायकल व चोरीची रोख रक्कम हस्तगत.

नागपुर शहराला लागुन असलेले सर्वात जवळचे पो स्टे कळमेश्वर ग्रामीण भागात मुख्यत: शेतकरी वर्ग असुन बहुतांश लोकांकडे त्यांचे शेतामधील विहीरीमधुन पाणी काढण्यासाठी मोटारी बसविलेल्या आहे. सदर मोटारी चोरी जात असल्याबाबत मागील काही दिवसापासुन पो स्टे ला तक्रारी येत होत्या. व कळमेश्वर पोलीस दिवसरात्र मेहनत करून अज्ञात आरोपीतांचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत होते.

दिनांक ११.२.२२ रोजी कळमेश्वर पोस्टे ला एम आय डि सी परीसरात एक अशोक ले लॅंड कंपनीचा छोटी पिकअप गाडी, बेवारस उभी आहे. अशी खबर मिळाली होती. त्यावरून कळमेश्वर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सपोनि.प्रविण मुंडे यांचे मार्गदर्शन घेवुन सदर वाहनाबाबत माहीती काढण्याचा प्रयत्न करीत असतांना सदर वाहन हे चोरीचे असल्याबाबत संशय असल्याने व आरोपी सदर वाहन परत घेण्यासाठी नक्की परत येईल याची खात्री असल्याने दिनांक ११/२/२२ पासुन तेथे ट्रॅप लावुन, आरोपी येण्याचे वाट पाहत होते. दि १३/२/२२ रोजी ४/३० वा सुमारास दोन संशयीत ईसम हे बेवारस लेलॅंड मालवाहु पिकअप जवळ दुस—या पिकअप गाडीने येवुन बेवारस पिकअप गाडी जवळ उतरले असता यातील नमुद स्टॉफ ने नमुद दोन इसमास पकडुन ताब्यात घेतले. व त्यांचे नावाबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे नाव **१. आकाश प्रकाश उईके वय २७ वर्ष रा वाणाडोंगरी गेडाम ले आउट, हीगणा नागपुर २. शशांक विनोद दारकोंडे वय ३३ वर्ष रा प्लॉट क्र २०, पिपळा फाटा हुडकेश्वर नागपुर** असे सांगितले वरील इसमांनी सोबत आणलेल्या पिकअप गाडीचे कागदपत्रे विचारले असता जवळ कोणतेही कागदपत्र मिळुन आले नाही.

सदर इसमाचे रेकॉर्ड चेक केले असता, सदर दोन्ही इसमांवर नागपुर शहर येथे चोरी, घरफोडी, चे वेगवेगळे गुन्हे दाखल असल्याचे माहीती झाले. त्यावरून सदर इसमांना पुन्हा विचारपुस केली असता, त्यांनी कळमेश्वर पोस्टे हद्‌दीत लिंगा, वलनी व फेटरी येथे चोरी केले असल्याचे माहीती दिली.

वरील आरोपीतांनी कळमेश्वर पोस्टे ला दाखल अप क्र ७१३/२१ भादवि कलम ३७९ भादवि प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी प्रविण बळीराम रामटेके रा लिंगा यांचे शेतातील दिनांक १७.१२.२१ रोजी रात्री व कळमेश्वर पोस्टे दाखल अप क्र ७१४/२१ कलम ३७९ भादवि प्रमाणे दाखल गुन्हयातील फिर्यादी मयुर भोजराज सोनसरे रा वलनी यांचे शेतातुन पाण्याची मोटर चोरून नेले असल्याचे तसेच कळमेश्वर पोस्टे ला दाखल अप क्र ५८/२२ कलम ४५७,३८० भादवि प्रमाणे गुन्हयातील फेटरी येथील इलेक्ट्रीक दुकान फोडुन त्यामधुन जुन्या मोटारी चोरून नेले असल्याचे कबुली दिली आहे. व सदर आरोपीने चोरून नेलेल्या मुद्‌देमाल विकुन प्राप्त रोख रक्कम त्यांचेकडुन हस्तगत करण्यात आली आहे.

वरील आरोपीने नागपुर शहरातील वाडी पोस्टे हद्दीतुन अशोक ले लॅड कंपनीचा छोटा पिकअप शांतीनगर पोस्टे परीसरातुन एक मोटरसायकल व पोस्टे नागपुर ग्रामीण हद्दीतुन एक पिकअप चोरूण आणल्याची कबुली दिली असुन आरोपीकडुन खालीलप्रमाणे माल जप्त करण्यात आला आहे.

१. दोन अशोक ले लॅड कंपनीचे पिकअप किंमत १५,००,०००/—रू
२. एक हीरो होंडा सुपर स्प्लेंडर क्र एम एच ४० ई ५६८२
३. मोसा विकुन उरलेली रोख रक्कम ५,५००/— रू चा माल असा **एकुण १५,४२,५००/—रू चा माल** जप्त करून ताब्यात घेतला.

तसेच आरोपी नामे शशांक विनोंद दारकोंडे वय ३३ वर्ष रा प्लॉट नं २० पिपळा फाटा, हुडकेश्वर नागपुर हा अप क्रग २०२/२१ भादवि कलम ३७९ भादवि प्रमाणे दाखल गुन्हयात देखील फरार असल्याबाबत आरोपीने कबुली दिलेली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक सा. नागपुर ग्रामीण, मा. अप्पर पोलीस अधिक्षक सा., उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, प्रभारी अधिकारी कळमेश्वर, पोस्टे सहायक पोलीस निरीक्षक श्री प्रविण मुंडे यांचे मार्गदर्शनात सपोनि मनोज खडसे, यांचे नेतृत्वाखाली स.फौ. नौरंगाबादे, पोलीस हवालदार रविंद्र बुरांडे, पालीस नाईक श्रीकांत बोरकर, गणेश मुदमाळी, निलेश उईके, पोलीस कॉस्टेबल राणा सिंग, यांनी केली आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे)

## विषेश कामगिरी अहवाल

दिनांक २०/०१/२२ रोजी १०.३० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन वेलतुर हद्दीतील मौजा कुजबा गावातील महीला आम नदीचे पात्रातुन रोजमजुरीचे कामावर डोंग्याने जात असता, डोंगा पल्टी झाल्याने आम नदीचे पात्रात बुडाला. त्यामध्ये कुजबा येथील सौ. गिता रामदास निबर्ते वय २८ वर्ष या महीलेचा प्राथमीक आरोग्य केंद्र मांढळ येथे उपचारादरम्यान मृत्यु झाला. गावातील नदीपात्राजवळ हजर असलेले दोन इसम नामे **१. मंगल घनश्याम भोयर २. मोहन गोविंद मेश्राम यांनी** वेळीच प्रसंगावधान राखत आपल्या जिवाची बाजी लावुन डोंग्यात बसलेले उर्वरीत पाच मजुर नामे— १. परमांनद रामचंद्र तिजारे २. लक्ष्मी लोमेश्वर गिरी ३. मंगला देवराव भोयर ४. मोनु सुरेश साळवे व ५. मनिषा राजु ठक्कर यांचे प्राण वाचविण्यास त्यांना यश मिळाले आहे.

.त्यांचे या शौर्यासाठी मा. पोलीस अधिक्षक साहेब, नागपुर ग्रामीण यांनी **१. मंगल घनश्याम भोयर २. मोहन गोविंद मेश्राम यांचे त्यांनी** केलेल्या धाडसी कामगिरी बद्दल कौतुक करून पोलीस मुख्यालय नागपुर येथे बोलावुन सत्कार केलेले आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे)

## जबरी चोरी करणा—या आरोपीतांवर गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन कोंढाळी** — अंतर्गत मौजा किर्ती आरा मशिन ०१ किमी पश्चिम. दिनांक १४/०२/२०२२ चे २०/५५ वा. यातील फिर्यादी हे भारत पेट्रोलपंप कोंढाळी येथुन हिशोबाचे **९८,०४०/—** रू घेवुन मोटार स्कुटी क्र. एम.एच. ४०—ए.झेड—४५५९ ने घरी जात असतांना दोन अनोळखी इसम वय अंदाजे २० ते २५ वर्ष, यापैकी एकाने फिर्यादीला मोटार स्कुटी वरून खाली ढकलुन दुस—या इसमाने फिर्यादी याचे अंगावर लाल मिरची पावडर फेकले व त्याने फिर्यादी यांना बाजुला पाच फुट अंतरावर ओढत नेले, मोटार स्कुटी खाली पडल्याने डिक्की उघडली व सदर अज्ञात इसमांनी डिक्की मध्ये बॅगेत ठेवलेले **९८,०४०/रू** बॅगेसह पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रकाश गोविंदराव ढवळे वय ६२ वर्ष रा ढवळेपुरा कोंढाळी ता काटोल जि नागपूर यांचे रिपोर्टवरून पोस्टे कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३९२,३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सपोनि कदम पोस्टे कोंढाळी मोनं ९११२९८५९२२ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**